परिपत्रक
.....

CR1972020122

क्र • कॉन/एल् • आर • ७५
पुणे, दिनांक ७/२/७२

५३१

विषय : जमीन एकत्रीकरण योजनेचे कागद
जिल्हा भूमापन कार्यालयात ठेवण्याबाबत

जमीन एकत्रीकरण योजनेचे जे कागद जिल्हा भूमापन कार्यालयामध्ये रेकॉर्डात सामिल करण्यासाठी पाठविण्यात येतात • ते कागद म्हणजे स्कीमचे कागद व नकाशा (असल प्रत) हे होत • हे कागद रेकॉर्डातील 'ए' व 'बी' दप्तरांत कोठे व कसे ठेवावयाचे या बाबतच्या सूचना खाली देण्यात येत आहेत •

(१) योजनेची मूळ (असल ) प्रत 'ए' रेकॉर्डात दप्तरांत ठेवावी •

(२) योजनेची दुसरी प्रत 'बी' रेकॉर्डमध्ये दप्तरात ठेवावी •

(३) नकाशाची असल प्रत ज्यावर गटाच्या हद्दी दाखविलेल्या असतात ती 'ए' रेकॉर्डात ओरिजन व रिव्हीजन सर्व्हेचे कच्चे नकाशे ज्या प्रमाणे नळकांड्यात ठेवतात त्या प्रमाणे ठेवावी • 'बी' रेकॉर्डात नकाशाची दुसरी प्रत ठेवण्याची जरुरी नाही •

या प्रमाणे रेकॉर्डात कागद ठेवण्याचे आहेत • या खेरीज इतर कागदांची वर्गवारी ए, बी •, सी, डी लिस्टांत दाखल करण्यात आलेली आहे •

सही : स • मो • कमरुद्दीन,
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, म • रा • पुणे

प्रत : उपसंचालक, भूमि अभिलेख, पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी रवाना •

प्रत : सर्व एकत्रीकरण अधिकारी व सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी/जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख यांना पुढील कार्यवाहीसाठी रवाना •

'निर्गमित',

प. वा. देशपांडे ७.२.७२
सहाय्यक जमाबंदी आयुक्त
(सर्वसाधारण) पुणे

को/११२२२